सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. 300/२०२२

तातडीचे

विषय : विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग, प्रशाकीय कार्यालये, वसतिगृहे, अभ्यागत निवास, भोजनगृह येथील निर्लेखित केलेल्या निरुपयोगी व वापरायोग्य नसलेल्या वस्तू, फर्निचर, ई—वेस्ट, विद्युत साहित्य, प्लास्टिक, सर्व प्रकारची रद्दी इत्यादींचा लिलाव करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सन २०२२—२३ साठी विषयांकित साहित्यांच्या लिलावाची प्रक्रीया करण्याचे नियोजन केले आहे.

तरी वित्त विभागाचे परिपत्रक क्र. २४२/२००९ व दि. २६/१२/२०१५ चे पत्रक क्र. Fin/2015-16/2107 अनुसार सर्व विभाग/शाखांमधील समितीने सदर वस्तूंची यादी तयार करावी व प्रमाणपत्राद्वारे सदर वस्तू उपयोगी तसेच दुरुस्तीस योग्य नाहीत, असे नमुद करुन मा. वित्त व लेखा विभागामार्फत सदर प्रस्तावास मा. कुलगुरु यांची तातडीने मान्यता घ्यावी व सदर प्रस्ताव पुढील प्रक्रियेकरीता कार्यकारी अभियंता (प्रकल्प), स्थावर विभाग यांचेकडे पाठवावेत.

केंद्र शासन तसेच महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभागाचे मार्गदर्शक तत्वानुसार ई—वेस्ट साहित्य जसे की संगणक, प्रिंटर, एलसीडी मॉनिटर्स, प्रयोगशाळेतील विविध इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रोमॅकॅनिकल उपकरणे इ. साहित्यांचे वर्गीकरण वेगळे करणे आवश्यक असून सदर ई—वेस्ट योग्य परवानाधारक लिलाव धारकाला विकणे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रस्ताव देताना ई—वेस्ट व फर्निचरची वेगवेगळी यादी स्थावर विभागाकडे पाठविण्यात यावी. त्याचप्रमाणे आपल्या विभागातील भंगार मालाचा प्रस्ताव निरंक असल्यास तसे स्थावर विभागास कळविण्यात यावे, ही विनंती.

08/10/2022
कार्यकारी अभियंता (प्रकल्प)

प्रत माहितीसाठी:—
१. मा. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
३. मा. वित्त व लेखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.